या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १५ जून २०२४ | अंक१८८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# लई सलाईन लावल्या, आता नसा सापडत नाहीत, मनोज जरांगे पाटील यांची तब्येत आता कशी आहे?

## डोंगरात आंदोलन करणार

मी आता घरी जाणार आहे. तिथे जाऊन रणनीती ठरवणार आहे. मी घरी जाणार असेल तर त्यात काय लबाडी आहे? शहागड येथे आम्हाला कार्यालय घ्यावं लागणार आहे. अंतरवली सोडायचा विषय नाही. लोकांना त्रास होऊ नये, वर्दळ होईल म्हणून शहागड येथे कार्यालय घेणार असल्याचं सांगितलं. अंतरवली गावाचे उपकार मी कधीच विसरणार नाही. आजपासूनच आम्ही राज्यपातळीवरचं काम सुरू करणार आहोत. मी घरी, डोंगरात गेलो तरी आंदोलन सोडणार नाही, असा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.

## समाजाच्या जीवावर कुणी पैसे उकळत असेल तर चूक आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी काल उपोषण सोडलं आहे. मात्र, उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटील यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अशक्तपणा जाणवल्याने त्यांना सलाईन लावण्यात आल्या आहेत. त्यांना बोलताना थोडा दम लागतो. पण एकूण त्यांची प्रकृती ठिक आहे. सध्या माझी तब्येत ठिक आहे. रुग्णालयातून सुटका झाल्यावर मी तडक घराकडे जाणार आहे. घरी गेलो म्हणजे माझं आंदोलन संपलं असं नाही. मी गावाला डोंगरावर राहून आंदोलन करेल, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.माझी तब्येत सध्या ठिक आहे. तूर्तास आता उपोषण नाही. मला उठता येईना, तोंड धुता येईना. त्यांनी लई सलाईन लावल्या. आता नसा सापडत नाहीत. पुढच्या वेळी डोंगरावर उपोषण करणार आहे. आम्हाला त्रास झाला असं कोणी म्हणता कामा नये. गावालाच राहीन. पण डोंगरावरून उपोषण करून समाजाला न्याय देईन, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. तर रणनीती वेगळीच असेलआंदोलनाचं ठिकाण हे अंतरवलीच असेल. पण शहागडमध्ये लोकांच्या समस्या सोडवल्या जातील. म्हणून शहागडला आम्ही कार्यालय घेणार आहोत. त्यामुळे समाजाच्या लोकांना हक्काचं ठिकाण मिळणार आहे, असं सांगतानाच आम्हाला कुणीही आरक्षण द्या. कुठंही द्या. पण आरक्षण नाही दिलं तर आमची पुढची रणनीती वेगळी असणार आहे, असा इशाराच त्यांनी दिला.

## प्रत्येक दिंडीला मिळणार इतक्या हजारांचं अनुदान, मुख्यमंत्र्यांची घोषणा



आषाढीच्या वारीसाठी राज्यभरातून दिंड्या पुण्यात दाखल होतात, आपल्या विठुरायाचा जयघोष करत चालत पंढरीच्या दिशने जातात. गावांगावांमधून वारकरी दिंड्यांमध्ये येतात, दिंड्यांमध्येच सर्व प्रमुख नियोजन पाहत असतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी घोषणा केली. वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंडीला प्रत्येकी वीस हजार रूपयांचं अनुदान देण्याची घोषणा एकनाथ शिंदेंनी केली आहे. वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून त्यांना ही आर्थिक मदत खूप फायद्याची ठरणार आहे.

## केतुरा मार्गे नगद नारायण गडावरून साक्षाळ पिंपरी मार्गे बस चालु करा , परमेश्वर नाना तळेकर

### सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुला मुलींना लालपरी ची सोय करा

**बीड प्रतिनिधी, अंकुश गवळी**
बीड तालुक्यातील केतुरा मार्गे जाणारी बस केतुरा मार्गे नगद नारायण गडावरून साक्षाळ पिंपरी येथे बस चालू करा या मागणीचे निवेदन केतुरा गावचे विद्यमान सरपंच तथा शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड जिल्हाप्रमुख सरपंच उपसरपंच संघटना महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे निवेदन वरील विषयी विनंती निवेदन करण्यात येते मौजे केतुरा तालुका



जिल्हा बीड येथील 8.वाजता व संध्याकाळी 4.वाजता येणारी बस वेळेवर चालू करण्यात यावी, ही गाडी मौजे केतुरा मार्गे, श्री क्षेत्र नारायण गडावर साक्षाळ पिंपरी मार्गे नवीन रस्त्याचा सर्वे करून वेळेवर चालू करण्यात यावी, याबाबत यापूर्वी दोन निवेदन आगार, व्यवस्थापकांना दिलेले आहेत, या मार्गावरून अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी प्रवास करत आहे, श्री क्षेत्र नारायण गड या ठिकाणी दहावीपर्यंतची शाळा आहे, उमरद, केतुरा, अवलपूर, रुद्रापूर, या गावचे विद्यार्थी नारायण गड व साक्षाळ पिंपरी येथे जात आहेत, अन्य वाहनांची सोय नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या गरीब मुलांना शाळेत जाण्यासाठी आपल्या लालपरी ला पाठवण्यात यावे ,अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख तथा केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी आगर व्यवस्थापकांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे,

## जनावरांची वाहतुक करणा-या वाहतुकदारांनी वाहनाची नोंदणी प्राधिकरणाकडे करुन घ्यावी

**बीड/प्रतिनिधी**
बीड, दि. 14 :- जनावरांची वाहतुक करणा-या वाहतुकदारांनी जनावरांची वाहतूक करण्यापूर्वी आपल्या वाहनामध्ये केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 125 ई च्या तरतुदीनुसार वाहनांच्या बांधणीमध्ये सुयोग्य बदल करुन आपल्या वाहनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे करुन Specinl License प्राप्त करुन घ्यावे.


Thc Prevention of Cruelty to Animnls Trnnsport of Animals on Foot Rules 2001 च्यानियम 96 च्या तरतुदीनुसार वाहनातुन जनावरांची वाहतूक करतांना वाहतुकदाराने सक्षम प्राधिकारण तथा Animal welfare Board of india यांनी तसेच केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी वा व्यक्ती वा प्राणी कल्याण संस्था यांनी जारी प्रमाणपत्र सोबत बाळगावे.

नमूद प्रमाणपत्र जारी केले नसल्यास जनावरांच्या वाहतुक करण्यास वाहतुकदाराने नकार देणे अपेक्षीत आहे.

तसेच , The Prevention of Cruelty to Animals Act 1960 The Transport of Animals Rules 1978 व The Prevention of Cruelty to Animals (Transport of Animals on Foot) Rules 2001 या कायदा व नियमांच्या तरतुदीचे काटेकोरपणे पालन केल्याखेरीज जनवारांची वाहतुक करण्यात येऊ नये. या तरतुदींचे पालन न केल्यास संबधित कायदे नियमातील तरतुदीनुसार संबधिताविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

## आज श्री क्षेत्र चाकरवाडी येथे महंत प्रकाश महाराज बोधले यांचे कीर्तन..

बीड प्रतिनिधी - विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या 24 व्या पुण्यतिथी उत्सवात आज दि १५ वार शनिवार रोजी रात्री 8.30 ते 10.30 या वेळेत दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प महंत प्रकाश महाराज बोधले यांचे होणार आहे. तरी



या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन बाळनाथ माऊली संस्थांनचे तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य ह भ प महादेव महाराज तात्या, नारायण महाराज भाऊ तसेच श्री क्षेत्र चाकरवाडी कर ग्रामस्थांच्या आणि माऊली भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जय शिवसंग्रामला महायुतीचा घटक पक्ष म्हणून मान्यता




**मुंबई प्रतिनिधी** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मान्यतेने जय शिवसंग्राम या पक्षाला महायुतीच्या घटक पक्षात सामावून घेतले असल्या बाबत महायुतीचे मुख्य प्रवक्ते प्रसाद लाड यांनी अधिकृत पत्र जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या शिष्टमंडळाला दिले. पक्षाच्या स्थापनेनंतर अवघ्या चार महिन्यात स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांच्या स्वप्नांना बळ देण्यात यश मिळाल्याने राज्यभरातील जय शिवसंग्राम सैनिकांमधून उस्फूर्तपणे स्वागत होत आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये जय शिवसंग्रामला प्रमुख घटक पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली आहे. लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांनी त्यावेळी सत्तेला लाथ मारून विरोधी पक्षात असलेल्या भाजपाला जाहीरपणे साथ दिली होती. मेटे साहेबांनी मराठा आरक्षण आणि महायुतीला बिनशर्त पाठबळ कायम दिले. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर यामध्ये जी पोकळी निर्माण झाली होती ती पोकळी भरून काढण्यात स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे लहान बंधू रामहरी मेटे यांना यश मिळाले आहे.त्यांनी अवघ्या चार महिन्यापूर्वी जय शिवसंग्रामची स्थापना स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी स्थापन केली. राज्यभरातील मेटे समर्थकांनी मोठ्या संख्येने जय शिवसंग्राम पक्षामध्ये प्रवेश करत जय शिवसंग्रामला स्वीकारले आहे. जय शिवसंग्राम पक्षामध्ये दिवसेंदिवस मेटे साहेबांचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह नवीन विचारधारेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने पक्षप्रवेश करत आहेत. जय शिवसंग्रामची अवघ्या चार महिन्यातील ही उभारी लक्षात घेऊन महायुतीने जय शिवसंग्रामला महायुतीचा घटक पक्ष म्हणून स्वीकारले आहे. स्वर्गीय मेटे साहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या जय शिवसंग्रामला यामुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे. जय शिवसंग्राम राज्यभरात आगामी काळात महायुती सोबत निष्ठेने बिनशर्त पाठीशी राहील अशी ग्वाही जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांनी देऊन महायुतीचे आभार व्यक्त केले आहेत.या निर्णयानंतर जय शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यभरात फटाक्यांची आतिषबाजी करत महायुतीमध्ये सामावून घेतल्याबद्दल आनंदोत्सव सुरू केला आहे.

## कविता

### मनातला पाऊस!

पाऊस कोसळू लागल्यावर
मन कसं भरुन येतं
मनामध्ये दाटलेल
मळभ सारं धुऊन जातं.

कधी कधी वाटतं
रोजच पाऊस यावा
मनात साचलेल्या जळमटांचा
पूर वाहून जावा.

मनं व्हावीत प्रफुल्लित
धुऊन गेलेल्या रस्त्यापरिस
नात्यांनाही गंध सुटावा
भिजलेल्या मातीपरीस.

झोडपून निघाव्यात
हृदयात पडलेल्या गाठी
सैल होऊन जावी
मनातील संशयाची मिठी.

आनंदाला यावं उधाण
खळखळणाऱ्या पाण्यासारखं
नागमोडी वळणावरही
सहज वहावं ओहळासारखं.

पावसाच्या थेंबाने
धुमारे फुटतील मातीला
गहिवर येईल माणुसकीचा
मानवाच्या जातीला.

रंगून जावं रंगांमध्ये
पावसाच्या थेंबासारखं
अकड नसावी मनामध्ये
मिसळून घ्यावं मातीसारखं.

पावसाच्या सरींनो
सरसर या धरतीवर
आकाशीचा स्वर्ग पाठवा
या जगताच्या मातीवर!"

प्रा.पंजाबराव येडे

# शेतकऱ्यांनां ५६ कोटीहून अधिक वीज बील सवलतीचा लाभ प्रदान

## उर्वरित सर्व शेतकऱ्यानाही लाभ मिळणार-पालकमंत्री धनंजय मुंडे



**बीड प्रतिनिधी**

बीड, दि. 14 :- शासनाने जिल्हयात दुष्काळ सदृश्य स्थिती जाहीर केल्याने शेतकऱ्यांना आतापर्यंत 56 कोटी 80 लाख रुपये वीज बिल सवलत दिली. यातून वंचित राहिलेल्या 36 हजार शेतकऱ्यांना हा लाभ देण्याचा सकारात्मक निर्णय घेतला आहे. त्याची पूर्तता करण्याचे निर्देश राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिले.

जिल्ह्यातील वीज वितरण व अनुषंगिक बाबींचा आढावा पालकमंत्री यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका बैठकीत घेतला. या बैठकीस माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, आष्टीचे आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक तसेच वीज वितरण कंपनीचे अधिकारी अभियंता एम. डी घुर्मे, कार्यकारी अभियंता अ.ना.पाटील तसेच इतर अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यात यावर्षी दोन्ही हंगामात पावसाअभावी पिकांची स्थिती खराब राहीली असल्याने शासनाने संपूर्ण बीड जिल्हा दुष्काळ सदृश्य स्थितीचा जिल्हा घोषित केला. यातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांना 33 टक्के वीज बिल माफीचा निर्णय शासनाने घेतला होता.

जिल्ह्यात असलेल्या एक लाख 83 हजार 282 कृषी जोडण्यापैकी 1 लाख 47 हजार शेतकऱ्यांना दर तिमाही 28 लाख 40 लाख याप्रमाणे सवलत प्रदान करण्यात आली आहे. दोन तिमाही एकूण 56 लाख 80 हजाराची सवलत शेतकऱ्यांना मिळाली आहे.

उर्वरित 36 हजाराहून अधिक शेतकऱ्यांना लाभ द्यायचा बाकी आहे. शासन याबाबत सकारात्मक आहे. व हा लाभ त्या सर्व शेतकऱ्यांना त्वरित देण्याचे निर्देश पालकमंत्री यांनी दिले

आजच्या बैठकीत वीज वितरण कंपनीच्या वाहिनी विलगीकरण तसेच जुन्या तारा बदलणे, रोहित्र बदलणे या नियमित कामासह दुष्काळ सदृश्य स्थितीत दिला गेलेला लाभ व कृषी वीज पुरवठ्यासाठी जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या तरतुतीतील कामांचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यात विद्युत वाहिनी पुनर्गठण अर्थात आरडीएसएस अंतर्गत विविध कामे प्रस्तावित आहेत. या कामांचा आढावा घेताना ही कामे गतिमान व कालबद्ध पद्धतीने उद्दिष्ट ठरवून पूर्ण करण्याच्या सूचना श्री मुंडे यांनी यावेळी केल्या.

विविध तालुक्यात वीज मंडळाचे काम करणाऱ्या बाह्य यंत्रणांची संख्या कमी आहे यामुळे त्वरित खंडित वीज पुरवठा सुरळीत करणे शक्य होत नाही हे लक्षात घेऊन विभागनिहाय या यंत्रणांची संख्या वाढवून त्वरित सेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून वीज वितरण कंपनीने पावले उचलावित. असे पालकमंत्री म्हणाले.

कृषी पंप जोडणी जिल्ह्यात आजमितीस कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या 4770 आहे. ही जोडणी मार्च अखेर पूर्ण होणे अपेक्षित असले तरी याला गती देऊन ही सर्व जोडणी डिसेंबर 2024 पूर्वी पूर्ण करा अशा प्रकारचे निर्देश श्री मुंडे यांनी यावेळी दिले.

शेतकऱ्यांना दिवसा आठ तास व रात्री दहा तास विद्युत पुरवठ्याचे लक्ष समोर ठेवून कामे करा व त्या सर्व कामांना गती द्या, असेही पालकमंत्री यावेळी म्हणाले.

कृषी पंप जोडणीतील काही पुरवठा प्रकरणे सौर विद्युत द्वारे पुरवठा झाल्यास सर्व शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. या सर्वांसाठी पाठपुरावा करून कामे करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन पालकमंत्र्यांनी केले.

ज्या कामासाठी वीज वितरण कंपनीचा निधी उपलब्ध नाही ती कामे होण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून तरतूद करण्यात येते. या मधून होणारी कामे देखील कालबद्ध पद्धतीने पूर्ण करा अशा सूचना श्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

# शांतता समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

## बकरी ईदचा सन शांततेत पार पाडावा जिल्हाधिकारी

बीड, दि. 14 :- मुस्लिम धर्मियांचा सण बकरी ईद सोमवार दिनांक 17 जून रोजी आहे. हा सण शांततेत पार पडावा यासाठी प्रशासन सज्ज आहे आणि पोलीस दलानेही याची सर्व तयारी केली आहे. या सणासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे यांनी केले आहे.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, परिक्षाविधीन जिल्हाधिकारी अर्पिता ठुंबे,उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे,उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन दत्तात्रय इंगोले तसेच शांतता समिती






सदस्यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या काही दिवसापासून सोशल मीडियावर टाकण्यात आलेल्या विविध संदेशामुळे काही प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सर्वांनी सोशल मीडियावर असे संदेश न टाकण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले असे संदेश टाकणाऱ्यांवर पोलीस लक्ष ठेवून आहेत व सर्वांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

ज्या जनावरांची कुर्बानी देण्याची परवानगी आहे केवळ त्याच जनावरांची कुर्बानी देण्याची खबरदारी घेण्यात यावी तसेच तात्पुरत्या स्वरूपाचे काही ठिकाणी यासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहेत त्याच अधिकृत ठिकाणांचा वापर कुर्बाणीसाठी करण्यात यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सर्व नगरपालिका क्षेत्रात या काळात स्वच्छता ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले. बीड शहरातील स्वच्छता तसेच पाणीपुरवठ्याचा मुद्दा समिती सदस्यांनी बैठकीत मांडला. त्यांच्या सूचना लक्षात घेऊन नगरपालिका प्रशासनाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# मालवाहू गाड्यांची समोरासमोर धडक, एक ठार तर एक गंभीर

**गंगापुर प्रतिनिधी सुनिल झिंजूर्डे पाटील**
गंगापूर वैजापूर रोडवर जाकमाथवाडी येथील विठ्ठल आश्रमासमोर पिकअप व अशोक लेलैंड मध्ये झालेल्या अपघातात एक ठार तर एक गंभीर जखमी झाला असून अपघात एवढा जोरात होता की रस्त्यावर आंब्याचा सडा पडला तर दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गुजरात येथुनपैठणला आंबे घेऊन जाणा-या व गंगापूर येथुन वैजापूरच्या दिशेने जाणाऱ्या पिकअप क्रमांक एमएच २० जी सी ६७४८ व अशोक लेलंड क्रमांक एम एच २० डी ई ५३४३ या दोन मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांमध्ये १४ जुन रोजी सकाळी साडे पाच ते सहावाजे दरम्यान गंगापूर वैजापूर रोडवरील जाकमाथवाडी येथील विठ्ठल आश्रमासमोर भिषण अपघात झाला यामध्ये दोन्ही बाहनांचे मोठे नुकसान झाले तर रस्त्यावर आंब्याचा सडा पडला होता वा घटनेची माहिती मिळताच मोरया रुग्णवाहिका चालक सागर शेजवळ यांनी घटनास्थळी जाऊन जखमींना तात्काळ उपजिल्हा रुग्णालय येथे आणले असता डॉक्टरांनी स्वप्नील दयानंद साबले राहणार बाळूज याला तपासून मृत घोषित केले व जखमी अतुल संतोष बोरूडे राहणार कंवडगाव ता पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्यावर उपचार केले. या घटनेची माहिती मिळताच गंगापुर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.



# जागतिक योग दिनानिमित्त अंमळनेर येथे योग शिबिराचे आयोजन



जागतिक योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिविंग यांच्या वतीने कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय अंमळनेर (भां) ता.पाटोदा जि.बीड येथे दि. १७/०६/२०२४ ते दि. २२/०६/२०२४ पर्यंत सकाळी ०६ ते ०९ या वेळेत सहा दिवसाचे योग शिबिर आनंद अनुभूती शिबिर आयोजित केले आहे.तरी पंचक्रोशीतील सर्वांनी या योग शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.सुरेश गर्जे, रविंद्र कदम, धर्मराज शिंदे, प्रा. बंडू शेरकर यांनी केले आहे.या शिबिरात आनंदी जीवन जगण्याची कला, योग, प्राणायाम, ध्यान व अतिशय सुंदर अशी सुदर्शन क्रिया शिकवली जाते.या शिबिरात १८ ते ५५ वर्ष वयोगटातील लोक सहभागी होऊ शकतात.

# लिंबागणेशकरांचा वारंवार खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटला ; ट्रान्सफॉर्मर जळाला आणि २ तासातच नविन मिळाला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील ट्रान्सफॉर्मरची फ्युज पेटीची विजेच्या साहित्य अभावी कित्येक दिवसांपासून दुरावस्था होती. तुटलेली फ्युज, जळालेली केबल, पेटीला सुरक्षा कवच नव्हते त्यामुळे वारंवार रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना अंधारात रात्र काढावी लागत असे त्यामुळे नविनच फ्युज पेटी बसविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, हरिओम क्षीरसागर, कैलास गायकवाड, पांडुरंग वाणी, बशीर शेख, अभय वनवे यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांना केली होती. त्यानंतर लगेचच मागणी मान्य करत नविन फ्युज पेटी बसविण्यात आली.त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला असुन वारंवार वीजपुरवठा खंडित होणार नाही व या परीसरातील दुध डेअरी मालक, बँक सुविधा फब्रीकेशन, दवाखाने व ईतर व्यावसायिक यांची अडचण काही प्रमाणात दुर होण्यास मदत होणार आहे. अडचणींचा सामना करावा लागतो.

ट्रान्सफॉर्मर जळाला आणि हुरकुडे यांनी २ तासात नविन उपलब्ध करून दिला:- डॉ.गणेश ढवळे

ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रात्र अंधारात काढावीच लागतो परंतु ईतर अनेक महावितरणकडुन ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा नादुरुस्त झाला तर ३ दिवसात बदलुन मिळेल म्हणत त्यासाठी स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला माहिती देण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आला असला तरी ३ दिवसात ट्रान्सफॉर्मर मिळेल याची खात्री देता येत नाही. मात्र लिंबागणेशकरांना याचा सुखद अनुभव आला असुन लिंबागणेश बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर सायं ५ वाजता जळाल्याची माहिती डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी विजय हुलकुडे उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना दिल्यानंतर त्यांनी अवघ्या दोन तासात सायं ७ वाजता नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला.आणि रात्री लगेचच नविन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला यासाठी महावितरणचे कर्मचारी वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे तसेच अंकुश गायकवाड, तुकाराम गायकवाड व सहकाऱ्यांनी रात्रीतुन ट्रान्सफॉर्मर बसविला.याबद्दल उप अभियंता विजय हुलकुडे यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.



## शिवसैनिकानी घेतली पीककर्ज न देणाऱ्या बँकेची शाळा

गंगापुर प्रतिनिधीः सुनिल झिंजूर्डे पाटील खरीप हंगामाकरिता पीककर्ज मिळावे, याकरिता बँकेकडून मागविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करताना शेतकऱ्यांची मागील काही महिन्यांपासून दमछाक होत आहे. गुरुवारी ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील, शहर प्रमुख भाग्येश गंगवाल, डॉ. आबासाहेब शिरसाठ, श्रीलाल गायकवाड, ज्येष्ठ शिवसैनिक भीमसिंग राजपूत, उपशहर प्रमुख संतोस जोशी, प्रविण काळे, गोविन्द वल्ले, यांच्यासह कार्यकर्त्यांनी गंगापुर येथील बँक ऑफ बडोदा येथे जमा होऊन व्यवस्थापकाला चांगलेच धारेवर धरले. पीककर्ज वाटपामध्ये अनियमितता होत असल्याचा शेतकऱ्यांनी आरोप करत पीककर्ज वाटप करताना बँकेकडून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. पीककर्जाची संचिका बँकेकडे दाखल केल्यानंतरही या संचिका गुणानुक्रमे निकाली काढण्याऐवजी मर्जीतल्या व दलालामार्फत आलेल्या संचिकांना प्राधान्य दिले जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न लवकर सुटले नाहीत तर बँकेला पुन्हा घेराव घालू असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.



# पाटोद्यात वंचित बहुजन आघाडीचे रक्तदान शिबीर संपन्न

**पाटोदा/प्रतिनिधी**
वचित बहुजन आघाडीचे महासचिव सचिन मेघडंबर यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोद्यात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिराला युवकांसह पत्रकार सामाजिक कार्यकर्ते सर्वांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे धनगर समाजाचे नेते विष्णू देवकते बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे पाथरी तालुक्याचे महासचिव अशोक नरवडे साहेब माजलगाव तालुक्याचे महासचिव समाधान गायकवाड तर शिवशंभू चॅरिटेबल ट्रस्टचे जिल्हाध्यक्ष लखन वीर, सर, पाटोदा तालुकाध्यक्ष अनिकेत जावळे यावेळी उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला पाटोदा तालुक्यातील युवकांनी चांगला प्रतिसाद दिला शिवशंभु चॅरीटेबल ट्रस्ट व बंचित बहुजन आघाडी पाटोदा यांच्या संयुक्त विद्यामान हा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी सचिन मेघडंबर बांनी आपले मनोगत व्यक्त करताना रक्तदान कसे श्रेष्ठ आहे हे सांगितल कार्यक्रमाला सामाजिक राजकीय पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष गोरख झेंड तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड दीपक थोरात सुनील जावळे अनिकेत वाघमारे अक्षय वाघमारे इत्यादी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जालिंदर यादव सर यांनी केले तर आभार नितीन इंकर यांनी मांडले



# पालखी मिरवणुकीने माऊली दादा महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवास झाली सुरुवात..नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले..!

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडी मध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांची 24 वी lपुण्यतिथी उत्सवा निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहास पालखी मिरवणुकीने सुरुवात झाली आहे. भव्य पालखी शोभायात्रा शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्री क्षेत्र चाकरवाडी नगरी दुमदुमली. सकाळी माऊली धाम या ठिकाणाहून माऊली दादांच्या पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. संत महंतांच्या हस्ते टाळ वीणा मृदंग पालखी आणि ग्रंथ पूजन करण्यात आले. बंकटस्वामी मठाचे मठाधिपती ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या हस्ते टाळ वीणा मृदंग आणि पालखी पूजन करून भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात झाली. यावेळी उपस्थित ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे, चाकरवाडी गावचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, चाकरवाडी गावचे आदर्श सरपंच विनोदजी कवडे, गंगाधर पुरी तसेच महाराष्ट्रातील माऊली भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथे वै. सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या 24 व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात शुक्रवारी सकाळी मोठ्या थाटामाटात सुरुवात झाली यावर्षी नव्याने अभिनव उपक्रम घेत शोभायात्रेत भव्य पालखी मिरवणुक सकाळी ८ वाजता माऊलीधाम पासून ते माऊली समाधी स्थळापर्यंत पालखी मिरवणूक करण्यात आली यावेळी नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली. आठ दिवस होणाऱ्या या भव्य पुण्यतिथी उत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध श्रीराम कथा प्रवक्ते समाधान महाराज शर्मा यांची कथा संपन्न होत आहे कीर्तन भजन हरिपाठ या अध्यात्माच्या ज्ञानाबरोबरच जनप्रबोधनाची मोठी रेल चेल असणार अहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक वादक तसेच सर्व वारकरी मंडळींची उपस्थिती राहणार आहे. सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी माऊली भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाळनाथ माऊली संस्थानचे मठाधिपती ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या, ह भ प गुरुवर्य नारायण महाराज गिरी भाऊ यांनी केले आहे.

# बीड जामखेड नगर रस्त्याचे काम संथगतीने चालू वाहन चालकांनी नगर पुणे साठी मार्ग बदलला

**प्रतिनिधी/पाटोदा**
बीड जामखेड या मार्गाची काम चालू असल्याने बीड येथून पुणे मुंबई कडे जाणाऱ्या वाहन चालकांनी आपला मार्ग बदलला असून वाहने आता लिंबा देवी फाट्यापासून जात आहे काम संथगतीने होत आहे काम सौताडा धनगर जवळका येवलवाडी आदी ठिकाणच्या लोकांनी या कामामुळे प्रचंड हात होत आहे बीड चुंबळी फाटा मार्गे जामखेड नगर रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्याचे काम एकदम संथगतीने चालू असल्यामुळे वाहन चालकांचे प्रचंड हाल होत आहे या मार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी पर्यायी रस्ता म्हणून आपला मार्ग बदलला असून लिंबा देवी येथून कल्याण नगर ह्या लांब पल्ल्याच्या रस्त्याने प्रवास सुरू केला आहे पाटोदा तालुक्यातील सौताडा, वाजरा फाटा, येवलवाडी, धनगर जवळका, व पाटोदा शहरातील इतर गावांतील नागरिकांना दळन वळन करण्यासाठी प्रचंड हाल होत असून याचे परिणाम पाटोदा तालुक्यातील मार्केटवर दिसून येत आहे. बीड चुंबळी फाटा मार्गे जामखेड नगर रस्ताचे काम चालू असल्यामुळे एकही मोठे वाहन या रस्त्याने येत नसल्यामुळे पाटोदा शहरातील आवक जावक कमी झाली असुन यामुळे शहरातील मार्केट पूर्णता ढासळलेले आहे ह्या रस्त्याचे काम जलद गतीने करावे सोबतच काम ठरवून दिलेल्या चांगल्या प्रतीचे ठरवलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे प्चांगल्या प्रतीचं करावे अशी मागणी जनतेतून होत आहे



## द्रौपदाबाई खरटमोल यांचे निधन



अंबाजोगाईयेथीलद्रौपदाबाईनरसिंगरावखरटमोल यांचे वृध्दापकाळाने दि.१४ जुन शुक्रवार रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ९३ वर्षाच्या होत्या. द्रौपदाबाई खरटमोल ह्या स्वभावाने मनमिळावू तसेच दुसऱ्याच्या सुख दुःखात सहभागी होणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्या अत्यंत धार्मिक वृत्तीच्या होत्या, धार्मिक- सामाजिक, सांस्कृतिक सोहळ्यात त्या अग्रेसर असत. आपल्या संस्कारातून मुलांना योग्य मार्गदर्शन करून उत्तम पद्धतीने मुलाची जडण -घडण व्हावी या उद्देशाने त्यांनी कार्य केले. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.१५ जुन शनिवार रोजी सकाळी नऊ वाजता दासोपंत समाधी परिसर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पाच मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील पत्रकार गोविंद खरटमोल यांच्या त्या मातोश्री आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार १५ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## जरांगे उमदेवार देणार: छगन भुजबळांनी दंड थोपाटले, येवल्यात मराठा उमेदवार आला तर आवश्य या. स्वागत आहे

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या सगेसोयरे या मागणीसाठी सरकारला अल्टीमेटम दिला आहे. मनोज जरांगे सगेसोयरेच्या मागणीसाठी जालन्यातील अंतरवली सराटी या गावात नुकतंच पुन्हा उपोषणाला बसले होते. राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने उपोषणस्थळी जात मनोज जरांगे यांची समजूत काढली. यानंतर जरांगे यांनी सरकारला एक महिन्याचा कालावधी दिला आहे. राज्य सरकारने एक महिन्यात आपली मागणी मान्य केली नाही तर आपण विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाच्या उमेदवारांना उतरवू, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. त्यांच्या या वक्तव्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना प्रश्न विचारला



असता त्यांनी आपली भूमिका मांडली. छगन भुजबळ यांनी आज 'टीव्ही 9 मराठी'ला विशेष मुलाखत दिली. 'टीव्ही 9 मराठी'चे मॅनेजिंग एडिटर उमेश कुमावत यांनी त्यांची मुलाखत घेतली. यावेळी भुजबळांना मनोज जरांगे यांनी राज्यातील सर्व 288 जागांवर निवडणूक लढवली तर? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर भुजबळांनी आपली भूमिका मांडली. "लोकशाही आहे. कोणीही उभं राहू शकतं. चांगली गोष्ट आहे. त्यांचा कॉन्फिडन्स आहे. त्यांची किती ताकद आहे हे त्यांनी दाखवून दिलं पाहिजे. येवल्यात मराठा उमेदवार आला तर आवश्य या. स्वागत आहे", असं भुजबळ म्हणाले.

### मराठा की दलित, मुस्लिम, आदिवासींमुळे फटका बसला?

"मुस्लिम समाज युतीपासून दूर गेला होता. उदाहरण सांगतो. धुळ्यात सहा मतदारसंघापैकी पाच मतदारसंघात युतीचा उमेदवार फार पुढे आहे. एकच मतदारसंघ आहे, मालेगाव. त्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवार शोभाताई यांना 1 लाख 96 हजार मते पडली. आणि युतीच्या उमेदवाराला 4 हजार मते पडली. एकाच मतदारसंघात 2 लाखाने पुढे. दुसऱ्या 5 मतदारसंघातील खड्डा भरुन काढला. म्हणजे मुस्लिम विरोधात होते", असं छगन भुजबळ म्हणाले.

## संगीत क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवत घेतली भरारी

**शिरूर कासार प्रतिनिधी**

शिरूर कासार येथील ज्ञानाई संगीत विद्यालय संचलीत जामखेड मधील विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत भरारी घेतली असुन संगीत क्षेत्राची मान उंचावली असुन या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे . पंडीत उध्दवबापु आपेगांवकर यांचे शिष्य हरिप्रसाद गाडेकर यांनी शिरूर कासारमधील विद्यार्थ्यांना संगीताचे दालन म्हणून ज्ञानाई संगीत विद्यालय सुरू केले ,त्याच अंतर्गत जामखेडमधील विद्यार्थ्यांना देखील संगीत क्षेत्रातील वाटा दाखवल्या आहेत . जिवनाला आकार संगीतामुळे मिळतो तसेच शालेय अभ्यासाबरोबर संगीत कला आत्मसात केल्यास वेगळी ओळख निर्माण होत असते . अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मुंबई अंतर्गत असलेल्या सरस्वती संगीत विद्यालय धानोरा परिक्षा केंद्रावर हे विद्यार्थी परिक्षेस बसले होते त्यात विशेष प्राविण्य मिळवत या विद्यार्थ्यांनी यश संपादीत केले . विराज सूर्यवंशी ,स्वराज चकोर , अद्वैत होळकर , प्रणव लोंढे ,मनोज तातेड ,वंश डोंगरे , सार्थक कुलकर्णी यांनी विशेष प्राविण्य मिळवले . दिलेले धडे व सरावात सातत्य ठेवल्याने हे यश विद्यार्थांना मिळाले असे तालमणी हरिप्रसाद गाडेकर यांनी सांगितले. संगीत साधकाचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री सह मा.नगराध्यक्ष रोहिदास पाटील,दत्ता पाटील , गोविंद पाटील पोदार ईंग्लिश स्कुलचे संचालक सागर अंदूरे, नितीन तवटे ,प्रशांत कानडे , डॉ.सुर्यवंशी, डॉ.चकोर, डॉ.लोंढे, अमोल तातेड आदिंनी स्वागत व कौतुक केले .



### आमच्यामुळे पराभव? छे छे... यूपीत अजितदादा आहेत का?; छगन भुजबळ



लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला म्हणावं असं काही यश मिळालं नाही. महायुतीने महाराष्ट्रातील जागांवर आपला झेंडा रोवला. महायुतीमध्ये भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट तिघे सत्तेत असुनही महाविकास आघाडीविरूद्ध त्यांना यश मिळवता आलं नाही. राज्यातील महायुतीचे शिल्पकार भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पराभवाची जबाबदारी आपल्याकडे घेतली. तसं पाहायला गेलं तर अजित पवारांची या निवडणुकीमध्ये एकज जागा जिंकता आली. त्यामुळे राजकीय वर्तुळातही अजित पवारांना सोबत घेतलं पण त्याचा काही फायदा झाला नाही अशी चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर टीव्ही९ मराठीच्या मुलाखीतमध्ये राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना करण्यात आला. यावर उत्तर देताना अजित पवार काय यूपीत आहेत का, असा उत्तर देत भाजपला डिवचलं.

## कडा येथील मुख्य महामार्गावरील पुलाचे काम अपूर्णच

### पावसाळा सुरू झाल्याने केव्हाही पर्याय रस्ता वाहून जाऊ शकतो

**कडा/प्रतिनिधी**

पुलाचे काम चालू असल्याने जुने बस स्थानक ते स्मशानभूमी मार्गे नवीन बस स्थानक रेस्ट हाऊस असा मार्ग पर्याय काढला असला तरी या मार्गावरती वाहनचालक व प्रवाशांची कशी कसरत आहे हे प्रत्यक्ष प्रवास केल्याच्या नंतर समजते त्यामुळे सध्या पावसाळ्याच्या दिवसात संपूर्ण कडा गावातील पाणी स्मशानभूमी मार्गे नदीकडे येत असल्यामुळे रस्त्यावरती पाणीच पाणी दिसत आहे वाहन चालकांना व दुचाकी चालकांना मोठी जीवघेणी कसरत करावी लागत आहे त्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तसेच नदी वरती केलेला पर्याय रस्ता हा सरळ सरळ मुरूम भरून केलेला आहे त्यामध्ये नळ्या सुद्धा टाकलेल्या नाहीत मोठा पाऊस झाल्याच्या नंतर कुठलीही घटना घडू शकते

कडा येथील नगर बीड रस्त्यावरील पुलाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने जून महिन्यातही हे काम पूर्ण होईल का याबद्दल साशंकता निर्माण झाली आहे .

बीड लातूर धाराशिव विधान परिषद सदस्य आमदार सुरेश धस यांनी सुद्धा या ठिकाणी भेट देऊन तातडीने काम करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत तरी देखील सदरील काम पूर्ण होताना दिसत नाही.अचानक मोठा पाऊस झाल्यास जामखेड नगर हा महामार्ग बंद होऊ शकतो आणि प्रवाशांना मिरजगाव मार्गे वाहतूक वळवावी लागेल तसेच काही प्रवाशांना धामणगाव मार्गे अहमदनगर अशी वाहतूक करावी लागेल अशी एकंदरीत परिस्थिती दिसत आहे तर कडा गावांतर्गत असणाऱ्या सांगळे कर्डिले वस्ती, डोंगरगण रस्त्यावरील वस्ती , तळे वस्ती व इतर शेतात राहणाऱ्या लोकांना कड्याचा संपर्क करण्यासाठी शेरी मार्गे पर्याय रस्ता वापरावा लागेल अशी परिस्थिती दिसत आहे.

आष्टी कडा साबलखेड या रस्त्याचे काम मागच्या वर्षी एप्रिल महिन्यापासून सुरू झाले. हे काम खूप संथ गतीने सुरू असल्याने या रस्त्यावरून प्रवास करणे मोठ्या जिकरीचे झाले आहे . कोणताही रस्ता सलगपणे पूर्ण झालेला दिसत नाही. त्यातच कडा येथे कडी नदीवर असलेला पूल पाडून तिथे नवीन पुल बांधायचा आहे . रहदारीच्या दृष्टीने हा पूल महत्त्वाचा आहे. मात्र पुलाचे पाडकाम केल्यानंतर आतापर्यंत फक्त पूलाच्या भिंती अर्ध्या उंची एवढ्या बांधण्यात आलेल्या आहेत. आता पावसाळा सुरू झाला आहे. नदीला जर पाणी आलं तर हे काम पूर्ण कसे होईल हा ही प्रश्न आहेच. याशिवाय सध्या या मार्गावरील वाहतूक ज्या वळण रस्त्याने सुरू आहे तो रस्ता जर वाहून गेला तर नागरिकांनी येजा करायचे कसे हा ही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे महिनाभरापूर्वी येथील काही लोकप्रतिनिधी सोबत पत्रकारांनी या कामावर भेट दिली असता 15जून पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन संबंधित ठेकेदाराने दिले होते. मात्र पुलाचा कामाची सद्यस्थिती पाहता येत्या पंधरा तारखेपर्यंत पुलाचे काम पूर्ण होणे सर्वथा अशक्य आहे . कडा गावाच्या नागरिकांसाठी संपर्काच्या दृष्टीने आणि नगर बीड वाहतुकीसाठी कडी नदीवरील पूल महत्त्वाचा आहे. हा पुल लवकर बांधून पूर्ण झाला नाही तर सर्व वाहने धामणगाव किंवा शेरी खुर्द मार्गे जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही .



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com